स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या मानव्यविद्याशाखे अंतर्गत

अर्थशास्त्र विषयातील पीएच.डी. पदवीसाठी संशोधनाचा आराखडा

मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रातील कृषी पर्यटनाचा तुलनात्मक अभ्यास (२०१०—११ ते २०१९—२०)

संशोधक विद्यार्थी

रवंदळ भाऊसाहेब बाबुराव

एम.ए.,बी.एड.,सेट. (अर्थशास्त्र)

संशोधन मार्गदर्शक

प्रा. डॉ. आर.एस. शिंदे

अर्थशास्त्र विभाग प्रमुख

राजर्षी शाहू महाविद्यालय, परभणी, जि. परभणी

संशोधन केंद्र

अर्थशास्त्र विभाग

(सामाजिक शास्त्रे संकुल)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

जून – 2019

प्रस्तावना –

2011 च्या जनगणनेनुसार भारताची लोकसंख्या 121 कोटी आहे याचा अर्थ स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताच्या लोकसंख्येत 87 कोटींची वाढ झाली एकूण जागतिक लोकसंख्येपैकी भारतात 17.5 टक्के लोकसंख्या राहते. भारताचे एकूण क्षेत्रफळ 32,87,263 स्क्वे. कि.मी. इतके आहे, ते जागतिक क्षेत्रफळाच्या 2.4 टक्के असून एकूण क्षेत्रफळाच्या मानाने देशाची लोकसंख्या अतिरिक्त असल्याचे आढळते. वाढत्या लोकसंख्येचा शेती क्षेत्रावर अतिरिक्त भार निर्माण झाला असून त्यामुळे शेतजमीनींचे विभाजन आणि उपविभाजन झाले आहे. यामुळे शेतीचे धारणक्षेत्र बिगरकिफायतशीर झाल्यामुळे सिमांत आणि लहान शेतकऱ्यांची संख्या सतत वाढत आहे. 21 व्या शतकातील जागतिकीकरण, उदारीकरण, शेतमालाच्या किंमतीतील चढ–उतार, औषधे, खते व औजारांच्या वाढत्या किंमती यामुळे शेती व्यवसाय तोटयात चालला आहे. शेती व्यवसायाला शेतीपुरक उद्योगांची जोड दिल्यास शेतकऱ्यांना शाश्वत उत्पन्नाची हमी मिळू शकते. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना शेती उत्पादनात व सेवांमध्ये बदल करून आपले उत्पन्न वाढविण्याची चांगली संधी उपलब्ध आहे. यासाठी कृषीपुरक व्यवसाय म्हणून कृषी पर्यटन या क्षेत्राकडे पाहिले जाते.

भारताच्या एकूण देशांतर्गत राष्ट्रीय उत्पन्नात 2011 मध्ये पर्यटन क्षेत्राचा वाटा 5,651 दशलक्ष रूपये इतका होता. तो एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या 6.4 टक्के इतका आहे, त्यात 2022 पर्यंत 7.8 टक्के इतकी वाढ होईल अशी अपेक्षा आहे. 2009 ते 2018 या 10 वर्षात एकूण राष्ट्रीय उत्पन्नातील पर्यटन क्षेत्राचा वाटा सर्वाधिक वाढल्याचे दिसते. 21 व्या शतकात जागतिक अर्थव्यवस्था झपाटयाने विकसित होत असताना मानवी जीवनातील ताण–तणाव मोठया प्रमाणावर वाढले आहेत. आर्थिक संपन्नतेसाठी मानवाचे जीवन यंत्रवत झाले आहे. सध्याच्या धावपळीच्या व स्पर्धेच्या युगात व्यक्तिला बौध्दिक तसेच शारिरीक ताणाला

सामोरे जावे लागते. मनावरील व शरीरावरील ताण कमी करण्यास पर्यटनाची मदत होते.

''कामामुळे आलेला ताण कमी करण्यासाठी नेहमीची जागा बदलून काही दिवस मनाला शांतता देणाऱ्या ठिकाणी राहणे म्हणजे पर्यटन'' अशी थोडक्यात पर्यटनाची व्याख्या करता येईल. नवनवीन ठिकाणी जाणाऱ्या परंतु त्या ठिकाणी काही दिवस राहणाऱ्या व्यक्तीला पर्यटक असे म्हणतात.

महाराष्ट्रातील पर्यटन –

महाराष्ट्र राज्यात दरवर्षी देशाच्या विविध प्रांतातून चार कोटी आणि परदेशातून सुमारे 20 लाख पर्यटक येतात. त्यांची पसंती अजिंठा, वेरुळ, मुंबई, पंढरपुर, शिर्डी, पैठण, शनिशिंगणापूर या ठिकाणांना असते. मुख्यत्वे ऐतिहासिक व धार्मिक पर्यटन केले जाते. अलिकडे शैक्षणिक, व्यावसायिक व वैद्यकिय उपचारासाठी पर्यटन वाढले आहे.

शहरी माणसाला गावाकडच्या मातीची ओढ आहे. तर ग्रामीण भागात शेतपूरक व्यवसायाची गरज आहे. या दोन्हींची सांगड घालून कृषी पर्यटन वाढू शकते ही बाब लक्षात घेऊन 2004 मध्ये बारामती पासून सुरु झालेली कृषी पर्यटनाची चळवळ देशभर पसरली आहे. पर्यावरणाचा समतोल राखूण पर्यटनाचा आनंद देणारा कृषी पर्यटन हा व्यवसाय अलिकडे जोमाने विकसित होत आहे.

महाराष्ट्रातील कृषी पर्यटन –

भारत ही एक कृषी प्रधान अर्थव्यवस्था आहे. भारतातील 70% लोकसंख्या ग्रामीण भागात राहते. त्यामुळे भारताला खेडयांचा देश असे म्हणतात. खेडी स्वयंपूर्ण झाल्याशिवाय देशाचा विकास होणे शक्य नाही. खेडयांच्या विकासासाठी ग्रामीण भागाला केंद्रस्थानी ठेवून योजना तयार करणे आवश्यक आहे. ग्रामोद्योग, कृषी पुरक उद्योग आणि कृषि पर्यटनाद्वारे आर्थिक प्रगतीसाठी प्रयत्न केल्यास खेडी स्वावलंबी होण्यास मदत होईल. तसेच देशातील वाढते दारिद्रय,

बेरोजगारी, निरक्षरता, प्रदुषण, प्रादेशिक विषमता, शहरीकरण यासारख्या समस्याची तीव्रता कमी करण्यासाठी कृषी पर्यटन निश्चितच महत्वाची भूमिका बजावेल.

महाराष्ट्र राज्य कृषी पर्यटनाच्या क्षेत्रात अग्रेसर असून कृषी पर्यटन वाढीसाठी;(ATDC) Agri Tourism Development Corporation (2005) आणि (MART) Maharashtra State Agri & Rural Tourism Co-operative Federation Ltd. या संस्था कार्यरत आहेत. राज्यात एकूण 550 कृषी पर्यटन केंद्र अस्तित्त्वात आहेत. या केंद्रांना वर्षभरात सुमारे 2 लाखांपेक्षा अधिक पर्यटक भेट देत असतात. गेल्या काही वर्षात पर्यटकांचा ओढा कृषी पर्यटनाकडे वाढला असून पर्यटन केंद्रांची वार्षिक उलाढाल सुमारे 20 कोटींच्या पुढे गेली आहे.

ग्रामीण भागातील बहुतांश लोकसंख्या शेतीक्षेत्रावर अवलंबून असून ते आपला आधिकाधिक वेळ शेतीवर घालवतात. ग्रामीण भागात शांत व आनंददायक वातावरण, स्वच्छ हवा, पाणी, नैसर्गिक सुंदरता व ग्रामीण संस्कृती अनुभवास येते. हे वातावरण शहरी तसेच विदेशी लोकांना विशेष आवडते कृषी पर्यटनामुळे आर्थिक व सामाजिक विकासाला चालना मिळू शकते.

पर्यटन हा वस्तूचे उत्पादन न करता सहज पैसा मिळवून देणारा उ़द्योग आहे. सध्याच्या स्पर्धेच्या युगात मानवाला काही क्षणांचा विरंगुळा हवा असतो. तो पर्यटनाच्या माध्यमातून मिळतो. शेतकऱ्यांना उत्पन्नाचे नवीन साधन म्हणून कृषी पर्यटनाकडे पाहिले जाते. शेतकऱ्यांना पारंपारिक शेती बरोबर हा व्यवसाय करता येवू शकतो. त्यामुळे शेती या प्राथमिक व्यवसायाबरोबर कृषी पर्यटन हा दुय्यम व्यवसाय शेतकऱ्यांना पुरक व्यवसाय झाला आहे. कृषी पर्यटनामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात मोठया प्रमाणावर वाढ होताना दिसते. त्याचबरोबर राष्ट्रीय उत्पन्न वाढीसाठी हा व्यवसाय उपयुक्त ठरत आहे. कृषी पर्यटनामुळे शहरी व विदेशी पर्यटकांना ग्रामीण जीवनमान जवळून पाहता येते. तसेच प्रत्यक्ष शेतीच्या विविध

कामात सहभागी होण्याची संधी मिळते. त्यामुळे शेतकऱ्यांच्या कष्टाची जाणीव होण्यास मदत होईल यातुन अन्न धान्याची गरज व ते अनावश्यकरित्या वाया घालवण्याला काही प्रमाणात पायबंद बसू शकतो.

कृषी पर्यटन स्थळी कृषी प्रक्रिया केंद्र, हरितगृह, नर्सरी यासारखे उद्योग पर्यटकांचे आकर्षण ठरत आहेत. याबरोबरच इमूपालन, कुक्कूटपालन, शेळी, मेंढीपालन, देशी व विदेशी गायींचे संवर्धन, सेंद्रिय शेती, यासारखे प्रकल्प पर्यटकांच्या ज्ञानात भर घालतात. कृषी पर्यटनामुळे ग्रामीण संस्कृतीचे जतन होते. शहरी पर्यटकांना ग्रामीण भागाशी जोडण्याचे कार्य या माध्यमातून होताना दिसते यामुळे ग्रामीण व शहरी भागातील दरी कमी होण्यास निश्चितच मदत होवू शकते.

कृषी पर्यटनात पर्यटकांना ग्रामीण पध्दतीचे चुलीवरील भोजन देण्यात येते. विविध रानभाज्या व ग्रामीण पदार्थ शहरी पर्यटकांना आकर्षित करतात. ग्रामीण सांस्कृतिक कार्यक्रम, जागरण, गोंधळ, भारुड, लोकगीत, लोककला, भजन, याद्वारे पर्यटकांचे मनोरंजन होते. ग्रामीण लोकांनी तयार केलेल्या विविध वस्तुंना ग्राहक मिळाल्यामुळे रोजगाराच्या संधी प्राप्त होत आहेत. बचत गटांना त्यांनी तयार केलेल्या विविध वस्तू व पदार्थांसाठी हक्काची बाजारपेठ उपलब्ध होते.

अ) मराठवाडयातील कृषी पर्यटन केंद्रांची संख्या : (वर्ष – 2018)

अ.क्र.	जिल्हा	कृषी पर्यटन केंद्रांची संख्या
1	नांदेड	01
2	परभणी	01
3	जालना	01
4	औरंगाबाद	04
5	हिंगोली	–
6	लातूर	01
7	उस्मानाबाद	01
8	बीड	02

स्त्रोत : **ATDC – Agri Tourism Development Corporation**

ब) पश्चिम महाराष्ट्रातील कृषी पर्यटन केंद्रांची संख्या – (वर्ष – 2018)

अ.क्र.	जिल्हा	कृषी पर्यटन केंद्रांची संख्या
1	नाशिक	12
2	अहमदनगर	12
3	पुणे	106
4	सातारा	82
5	सांगली	3
6	सोलापूर	11
7	कोल्हापूर	8

स्त्रोत : **ATDC – Agri Tourism Development Corporation**

संशोधनाचे महत्व :–

भारतातील इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्र राज्य हे कृषी उद्योग, व्यापार, सेवा या सर्व बाबतीत अग्रेसर असून राज्याच्या विविध विभागांमध्ये नैसर्गिक साधनसामुग्री विपुल प्रमाणात उपलब्ध आहे. स्थानिक उपलब्ध साधन सामग्रीचा पर्याप्त वापर केल्यास कृषी पर्यटन मोठया प्रमाणावर वाढू शकते. राज्याच्या विविध विभागात हवामान, पाऊस, पाणी, चालीरिती, भाषा, वेशभूषा, पीक पद्धती इ. बाबतीत विविधता असल्याचे दिसते, त्याचा योग्य वापर केल्यास कृषी पर्यटनाच्या बाबतीत असणारी विषमता कमी करता येईल हे समजण्यास हे संशोधन उपयुक्त ठरू शकते.

अलिकडील काळात शहरी भागातील अनेकजण धावपळीचे जीवन व भौतिक जीवनशैली यापासून होणारा मानसिक ताण दुर करणे व मनाला शांती मिळण्यासाठी नैसर्गिक पर्यावरणाचा वारसा जपणाऱ्या कृषी पर्यटनाकडे आकर्षित होत आहेत.

1. कृषी पर्यटनाच्या बाबतीतील मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्र या दोन विभागातील विषमतेची कारणे शोधून काढणे शक्य होईल.
2. कृषी पर्यटनामुळे गावांचा विकास होवून शेतकऱ्यांच्या जीवनमानात सुधारणा होण्यास कशी मदत मिळत आहे हे अभ्यासता येईल.
3. भारत हा कृषीप्रधान देश असूनही शेतीकडे केवळ उदर निर्वाहाचे साधन म्हणून पाहिले जाते. त्यामुळे कृषी पर्यटन दूर्लक्षित राहिले आहे. त्याचे महत्व लक्षात आल्यास कृषी पर्यटन वाढण्यास मदत होईल.
4. कृषी पर्यटनामुळे स्थानिक ठिकाणी पर्यटनाच्या संधी वाढून मोठी लोकसंख्या त्याचा लाभ घेवू शकते.

5. कृषी पर्यटनामुळे शहरी लोकांमध्ये ग्रामीण समाजाशी एकरुप होण्याची इच्छा निर्माण होईल त्यामुळे शहरांवर होणारा अतिरिक्त लोकसंख्येचा ताण कमी होण्यास मदत होईल.
6. कृषी पर्यटनाला चालना मिळाल्यास ग्रामीण भागात पायाभूत सुविधा वाढीला चालना मिळेल.
7. कृषीपूरक व्यवसाय पर्यटन वाढीसाठी उपयुक्त ठरु शकत असल्याने त्यांच्या वाढीला पोषक वातावरण निर्माण होईल.
8. ग्रामीण लोकांना रोजगाराच्या विविध संधी उपलब्ध झाल्यामुळे बिगर हंगामी रोजगारातून त्यांना उत्पन्न प्राप्ती होवून त्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत होईल.
9. कृषी पर्यटनाद्वारे ग्रामीण विकासाला चालना मिळून शहरी व ग्रामीण विकासातील दरी दूर होण्यास मदत होईल.

या संशोधनाद्वारे कृषी पर्यटनातून ग्रामीण संस्कृती, समाजजीवन, अर्थव्यवस्था पर्यावरण यावर होणाऱ्या चांगल्या व वाईट परिणामाचा अभ्यास करुन कृषी पर्यटनाचा सुनियोजित आराखडा तयार करता येईल. ग्रामीण जीवनमान उंचावण्यासाठी आवश्यक त्या सुविधांचा आढावा घेवून त्या पुर्ण करण्यासाठी उपाययोजना करणे शक्य होईल. त्यामुळे ग्रामीण जीवनमान उंचावण्यास मदत होऊन ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासास चालना मिळेल.

संशोधन समस्या/विषयाची निवड :–

संदर्भ साहित्य, सर्वेक्षण व पाहणीवरुन असे दिसते की, पर्यावरणीय समस्यांमुळे भारतातील पाऊस व भूगर्भातील पाणीसाठा सतत कमी होत असल्याचे दिसून येते. सततच्या दुष्काळामुळे शेतकऱ्यांना जीवन जगणे असहय झाले आहे. शेतकरी शेतीतून मिळणाऱ्या उत्पन्नातून आपल्या मूलभूत गरजा देखील पुर्ण करू शकत नाहीत त्यामुळे शेती क्षेत्रात दारिद्रयाचे प्रमाण सर्वाधिक असल्याचे दिसते. पारंपारिक शेती बरोबरच शेतकऱ्यांना शेतीपुरक व्यवसाय करण्यास प्रवृत्त केल्यास त्यांच्या उत्पन्नात वाढ होऊन त्यांचा शेतीकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलू शकतो. कृषी पर्यटन हा शेतीपुरक व्यवसाय म्हणून शेतकऱ्यांचे जीवनमान बदलवून टाकणारा व्यवसाय होऊ शकतो शिवाय शहरी भागातील दुषित व तणावग्रस्त जीवनमानापासून सुटका मिळण्यासाठी शहरी लोकसंख्या कृषी पर्यटनाकडे वळत आहे. या संशोधनामुळे कृषी पर्यटनाची संपूर्ण माहिती उपलब्ध होवू शकते. स्पर्धेच्या तणावग्रस्त शहरी समस्यांपासून सुटका होण्यासाठी व शेकऱ्यांच्या जीवनमानात सुधारणा करण्यासाठी कृषी पर्यटन हा संशोधन विषय अतिशय महत्वपुर्ण आहे.

या संशोधनातून पर्यटनाचे महत्व विशद करणे, कृषी पर्यटनस्थळांवर प्रकाश टाकणे, त्यांचे उत्पन्न व खर्च तसेच येणाऱ्या पर्यटकांचा सामाजिक–आर्थिक स्तरानुसार अभ्यास करणे तसेच पर्यटकांना उपलब्ध करुन देण्यात येणाऱ्या विविध सुविधांचा अभ्यास करुन कृषी पर्यटनाला प्रसिध्दी मिळून देणे. मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रातील कृषी पर्यटनातील विषमता कमी करण्यासाठी हे संशोधन उपयुक्त ठरु शकेल. यासाठी मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्रातील कृषी पर्यटनाचा तुलनात्मक अभ्यास हे संशोधन कार्य हाती घेण्यात आले आहे. सदर संशोधनाची उदिष्टे पुढीलप्रमाणे आहेत.

संशोधनाची उदिष्टये:–

1. कृषी पर्यटन केंद्राचे स्वरुप, विकास व महत्त्व यांचा अभ्यास करणे.
2. मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्रातील कृषी पर्यटनाचा तुलनात्मक अभ्यास करणे.
3. कृषी पर्यटनामुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीत होणाऱ्या बदलाचा अभ्यास करणे.
4. कृषी पर्यटनासाठी विविध शासकीय योजना व धोरणांचा आढावा घेणे
5. कृषी पर्यटनाअंतर्गत पर्यटकांना देण्यात येणाऱ्या विविध सोयी–सुविधांचा व संबंधित घटकांच्या लाभांचा शोध घेणे.
6. कृषी पर्यटनासमोरील आव्हाने व संधी यावर प्रकाश टाकणे.
7. कृषी पर्यटन केंद्रांचा अभ्यास करताना प्रादेशिक विषमता कमी करण्यासाठी निष्कर्ष व शिफारशी सुचविणे.

संशोधनाची गृहितके :–

1. कृषी पर्यटनाच्या बाबतीत पश्चिम महाराष्ट्र राज्यातील इतर भागांच्या तुलनेत अतिशय अग्रेसर आहे.
2. मराठवाडयातील कृषी पर्यटन पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत दुर्लक्षित राहीले आहे.
3. कृषी पर्यटन केंद्रांची संख्या आणि आर्थिक उलाढाल सतत वाढत आहे.
4. कृषी पर्यटनामुळे स्थानिक लोकांना रोजगाराच्या विविध संधी उपलब्ध होत आहेत.

संशोधनाची व्याप्ती व मर्यादा –

पश्चिम महाराष्ट्रातील बहुतांश भागातील शेतीसाठी कायमस्वरुपी जलसिंचन सुविधा उपलब्ध आहे तर मराठवाडयातील बहुतांश शेती पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे. शेतमालाच्या किंमतीतील चढ उतारामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात सातत्य राहत नाही. यामुळे अनेक शेतकरी शेतीपूरक व्यवसायाकडे वळत आहेत. कुक्कूटपालन, शेळीमेंढी–पालन, हरितगृह, देशी व विदेशी गोपालन यासारखे शेतीपुरक व्यवसाय करत आहेत. मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रातील कृषी पर्यटनाचा तुलनात्मक अभ्यास केल्यामुळे संशोधनाला नेमकेपणा येणार आहे.

1. सदर शोध प्रबंधाची व्याप्ती मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रातील कृषी पर्यटनापुरती मर्यादित आहे.
2. कृषी पर्यटन हा नव्याने विकसित होत असलेला पर्यटन प्रकार असून याच्याशी संबंधित संशोधन अधिक प्रमाणात उपलब्ध नाही. त्यामुळे संशोधन कर्त्याला कृषी पर्यटन केंद्र, पर्यटक, स्थानिक नागरिक, ग्रामपंचायत, सरकारी कार्यालयाकडून माहिती संग्रहित करावी लागणार आहे.
3. संशोधनाची व्यापकता लक्षात घेता त्यासाठी मोठया प्रमाणावर वेळ, श्रम आणि पैशाची आवश्यकता लागणार आहे.
4. कृषी पर्यटन हा व्यवसाय सतत वाढत असून अभ्यासाच्या सोयीसाठी दहा वर्षांचा कालखंड विचारात घेण्यात आला आहे.

संशोधन पध्दती :–

नमुना निवड :

मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रातील कृषी पर्यटनाचा तुलनात्मक अभ्यास या संशोधनासाठी नमुना निवड करताना मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्र या दोन्ही विभागातील प्रातिनिधीक स्वरूपात ढोबळमानाने अभ्यास करण्यात येणार आहे. त्याचबरोबर लाभार्थी घटकांपैकी 25 टक्के घटकांची यादृच्छिक पध्दतीने निवड केली जाणार आहे.

प्रस्तुत संशोधनाकरीता सामाजिक संशोधन पध्दतीमधील पुढील दोन पध्दतींचा अवलंब करण्यात येणार आहे. त्यातून मिळालेल्या माहितीच्या आधारे प्रस्तुत संशोधन कार्य पूर्ण करण्यात येणार आहे.

1. प्राथमिक साधन सामग्री –

कृषी पर्यटन वाढीसाठी प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या मदत करणाऱ्या सर्वच घटकांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेवून कृषी पर्यटनाचा आर्थिक व सामाजिकदृष्टया समाजजीवनावर होणारा परिणाम त्यांचे नियोजन, व्यवस्थापन, सुविधा, समस्या इत्यादी माहिती संकलीत करण्यासाठी प्रत्यक्ष मुलाखत ही प्राथमिक साधन सामग्री पध्दत वापरण्यात येणार आहे.

2. दुय्यम साधन सामग्री –

मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रातील कृषी पर्यटनाचा तुलनात्मक अभ्यास या विषयावरील संशोधनासाठी संदर्भ संशोधन पध्दतीचा वापर करण्यात येणार आहे. सदर संशोधनातील आर्थिक व सामाजिक माहिती मिळविण्यासाठी पर्यटन विषयक मूळ ग्रंथ, सहाय्यक ग्रंथ, लेख, विविध संशोधन अहवाल, वेबसाईट, विविध जर्नल, प्रोजेक्ट रिपोर्ट, सरकारी व गैरसरकारी वार्षिक अहवाल यांचा वापर करण्यात येणार आहे.

संशोधन प्रबंधाचा संकल्पित आराखडा–

प्रकरण पहिले

प्रस्तावना

संशोधन विषय आणि ओळख, पर्यटन व्याख्या, स्वरूप आणि वैशिष्टे, पर्यटनाचे प्रकार. कृषी पर्यटन व्याख्या, स्वरूप आणि वैशिष्टे.

प्रकरण दुसरे

संशोधन प्रणाली व संशोधन विषयाचा आढावा

भूमिका, संशोधन विषय निवडीचे उद्देश, कृषी पर्यटन वाढीसाठी संशोधनाचे महत्व, संशोधनाची व्याप्ती व मर्यादा, संशोधनाची गृहिते, संशोधन पध्दती, संदर्भ साहित्याचा आढावा

प्रकरण तिसरे –

मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचा अभ्यास

महाराष्ट्राचे स्थान व क्षेत्र, महाराष्ट्राचे प्रशासकीय विभाग, महाराष्ट्रातील कृषी व्यवसाय, मराठवाडयाची भौगोलिक, ऐतिहासिक, सामाजिक, औद्योगिक आणि आर्थिक पार्श्वभूमी, स्थानिक प्रश्न आणि समस्या. पश्चिम महाराष्ट्राची ऐतिहासिक, सामाजिक, औद्योगिक आणि आर्थिक पार्श्वभूमी, स्थानिक प्रश्न आणि समस्या.

प्रकरण चौथे

मराठवाडयातील कृषी पर्यटन व्यवसायाचे स्वरुप

मराठवाडयाची भौगोलिक, सांस्कृतिक ,सामाजिक, आर्थिक, ऐतिहासिक वैशिष्टे, कृषी पर्यटनासाठी उपलब्ध पायाभूत सुविधा, प्रमुख कृषी पर्यटन स्थळे, कृषी पर्यटनाचा आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व पर्यावरणावर होणारा परिणाम

प्रकरण पाचवे

पश्चिम महाराष्ट्रातील कृषी पर्यटन व्यवसायाचे स्वरुप

पश्चिम महाराष्ट्राची भौगोलिक, सांस्कृतिक ,सामाजिक, आर्थिक, ऐतिहासिक वैशिष्टे, कृषी पर्यटनासाठी उपलब्ध पायाभूत सुविधा, प्रमुख कृषी पर्यटन स्थळे, कृषी पर्यटनाचा आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व पर्यावरणावर होणारा परिणाम

प्रकरण सहावे

मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रातील कृषी पर्यटन व्यवसायाचा तुलनात्मक अभ्यास

महाराष्ट्र राज्याचे पर्यटन व कृषी पर्यटन विषयक धोरण. कृषी पर्यटनातील मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्रातील विषमतेची कारणे. भौगोलिक, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक विविधतेचा कृषी पर्यटन वाढीवर झालेला परिणाम. कृषी पर्यटनाचा शेतकऱ्यांच्या जीवनमानावर झालेला परिणाम. कृषी पर्यटनपूरक व्यवसाय आणि स्थानिक रोजगार निर्मितीवर झालेला परिणाम. कृषी पर्यटनाचा आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व पर्यावरणावर झालेला परिणाम

प्रकरण सातवे

संशोधनाचे निष्कर्ष आणि शिफारसी

शासनाच्या पर्यटन धोरणाचे पर्यटन विकासातील योगदान, कृषी पर्यटन केंद्रांचे व्यवस्थापक व कर्मचारी यांचे पर्यटन वाढीसाठी विचार, स्थानिक लोक प्रतिनिधींचा कृषी पर्यटन वाढीतील सहभाग, पर्यटकांना उपलब्ध सुविधा आणि अडचणी, स्थानिक रोजगार वाढीतील कृषी पर्यटनाची भूमिका, पर्यावरण, संस्कृती व समाजजीवनावर होणारे परिणाम, कृषी पर्यटन वाढीसाठी सुचविण्यात येणाऱ्या विविध उपाययोजना

परिशिष्टेः—

अ) संदर्भ साहित्य/ग्रंथ सूची

ब) प्रश्नावली मुलाखत सूची

क) तक्ते व आलेख सूची

संदर्भ ग्रंथ सूची–

1. आगलावे प्रदिप (2000), संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे, विद्या प्रकाशन, नागपूर.
2. खैरनार दिलीप (2004), सामाजिक संशोधन पध्दती, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद.
3. घाटोळे रा.ना. (1995), समाजशास्त्रीय संशोधन तत्व आणि पध्दती, मंगेश प्रकाशन, नागपूर.

4- राव.पी.बी. (2011), रिसर्च मॅथडलॉजी इन इकॉनॉमिक्स, मार्क पब्लिशर्स, जयपूर.

5. गरसोळे सु., अपरिचित महाराष्ट्र, नितीन प्रकाशन, पुणे.
6. घारपूरे विठ्ठल (2001), पर्यटन भूगोल, पिंपळापूरे अॅन्ड कं. पब्लिशर्स, नागपूर.
7. घैसास वासंती (2007), प्रवास तंत्र आणि मंत्र, राजहंस प्रकाशन, पुणे.
8. जोशी लिली (2013), पर्यटन एक संजीवनी, रोहन प्रकाशन, पुणे.

9- पटवर्धन सू. (2000), प्रवासाला जायचंय तर काय कराल, अक्षत प्रकाशन.

10- पाटणकर पांडूरंग (1998), चला सहलीला, स्नेहल प्रकाशन, पुणे.

11- साने र. य., महाराष्ट्र पर्यटन कोष, विद्या विकास पब्लिशर्स प्रा. लि., नागपूर.

12- कठारे अनिल, मराठवाडयाचा इतिहास, एज्युकेशनल पब्लिशर्स.

13- भापकर पुरूषोत्तम, अग्रेसर मराठवाडा, आदित्य प्रकाशन, औरंगाबाद.

14- हाडवळे मनोज, कृषी पर्यटन – एक शेतीपुरक व्यवसाय, सकाळ प्रकाशन, पुणे.

15. प्रेक्षणीय महाराष्ट्र, पर्यटन विशेषांक, पुणे.
16. साप्ताहिक सकाळ, पर्यटन विशेषांक, पुणे.

17- Jack Randall (2011), Agriculture Tourism, Discovery Publishing House

18- Jha S.M. (1995), Tourism Marketing, Himalaya publishing House.

1- www.indiatourism.net

2- www.incredibleindia.org

3- www.exploreraralindia.org

4- www.maharashtratourism.gov.in

5- www.agritourism.in

6- www.martindia.org

संशोधक विद्यार्थी

रवंदळ भाऊसाहेब बाबुराव

संशोधन मार्गदर्शक

प्रा. डॉ. आर. एस. शिंदे
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
राजर्षी शाहू महाविद्यालय, परभणी, जि. परभणी